# म.गांधीजींचे धार्मिक विचार

**डॉ. सर्जेराव सदाशिव जाधव,** पदवी व पदव्युत्तर मराठी विभागप्रमुख, यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर.

---

**प्रस्तावना** - जगात भारत ज्या काही थोड्या व्यक्तींच्या नावाने ओळखला जातो त्यामध्ये "ईश्वर सत्य है पासून सत्य ही ईश्वर है" असा वैचारिक प्रवास करणाऱ्या म. गांधीजींचे नाव अग्रस्थानी घेतले जाते. गांधीजींचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ रोजी गुजरातमधील पोरबंदर येथील सुसंस्कृत ,प्रतिष्ठित आणि धार्मिक पार्श्वभूमी लाभलेल्या कुटुंबात झाला. त्यांची आई पुतलीबाई मोठी धार्मिक आणि श्रद्धावान प्रवृत्तीची होती. कुटुंबातील वैष्णववाणीचे संस्कार लहानपणीच त्यांच्या मनावर खोलवर रुजल्याचा परिणाम पुढे त्यांच्या अहिंसात्मक सत्याग्रहावर पडलेला जाणवतो. शिक्षण घेत असतानाच वयाच्या तेराव्या वर्षी त्यांचा कस्तुरबांशी विवाह झाला. गांधीजी पुढील शिक्षणासाठी भावनगरच्या कॉलेजमध्ये गेले पण अभ्यासात मन रमेना म्हणून थोडे पैसे जमवले व त्याच्या जोरावर इ.स.१८८८ मध्ये सप्टेंबर महिन्यात बॅरिस्टरीचा अभ्यास करण्यासाठी इंग्लंडला रवाना झाले. तेथे १६ जून १८९१ रोजी गांधीजी बॅरिस्टर झाले आणि लगेचच वकिली व्यवसाय करण्यासाठी भारतात परतले. मुंबईच्या न्यायालयात दीड वर्षे वकिली करून त्यांनी त्या व्यवसायात स्थिरावण्याचा प्रयत्न केला पण त्यांना स्थिरत्व लाभले नाही. पुढे ते एका मुस्लिम व्यापाऱ्याच्या खटल्यासाठी दक्षिण आफ्रिकेला गेले. तेथे त्यांना वर्णद्वेषाचे चटके सोसावे लागले. त्या विरोधात त्यांनी सुमारे २२ वर्ष यशस्वी लढा देऊन १९१५ च्या जानेवारीत ते भारतात परतले. येथे आल्यावर त्यांनी काँग्रेस पुढाऱ्यांमध्ये एक "मराठी नेता"म्हणून वेगळी प्रतिमा लोकांसमोर उभी केली.सर्वप्रथम त्यांनी संपूर्ण भारत फिरून देशस्थितीचे अवलोकन केले. अवलोकनार्थ देशकार्याने झपाटून विचाराला कृतीची जोड देत भारतामध्ये आपले महत्त्वाचे स्थान निर्माण केले. त्यांच्या सर्वांगीण कार्यावरून १९१५ मध्ये राजवैद्य जीवराम कालिदास यांनी गांधीजींना "महात्मा" हे संबोधन दिले. ६ जुलै १९४४ रोजी आकाशवाणी रंगून केंद्रावरून सुभाष चंद्र बोस यांनी गांधीजींचा "राष्ट्रपिता" म्हणून प्रथमच उल्लेख केला. खेड्यातील लोक तर त्यांना "गांधीबाप्पा"या नावाने संबोधू लागले. अशा विविध संबोधनांनी मुळचे मोहनदास करमचंद गांधी पुढे महात्मा, राष्ट्रपिता म्हणून साऱ्या जगात ओळखले जाऊ लागले. अशा महात्म्याचा ३० जानेवारी १९४८ रोजी सायंकाळी पाच वाजता निर्घृन खून झाला आणि अखंड भारत देश पोरका झाला.अशा राष्ट्रपित्याने देशाच्या धार्मिक क्षेत्रात जी अभूतपूर्व क्रांती केली तिचा विचार करणे क्रमप्राप्त आहे.

**धर्मविचार संकल्पना** - धर्म या शब्दाचा अर्थ संस्कृत भाषेत "शाश्वतमार्ग" असा होतो आणि त्याचा शब्दार्थ आहे जे धारण करण्यास योग्य आहे तो म्हणजे धर्म. जीवनाच्या सर्वोत्तम पद्धतींचा संग्रह म्हणजे धर्म असेही म्हणता येईल. थोडक्यात जे योग्य आहे, उचित आहे, चांगले आहे त्याला धर्म म्हणता येईल. जन्माला आलेल्या प्रत्येक मनुष्याला आपापलं कर्तव्य पार पाडणं हा त्याचा धर्म झाला.

विहितकर्मजन्योधर्मः। "निषिद्ध कर्मजन्यस्त्व धर्मः।" (तर्कसंग्रह) या संस्कृत वचनाप्रमाणे धर्म आणि अधर्म हे अदृष्टाचे दोन प्रकार आहेत. धर्माला पुण्य व अधर्माला पाप म्हणून ओळखले जाते. श्रुतीने सांगितलेल्या गोष्टी करणे म्हणजे धर्म (पुण्य) आणि श्रुतीने निषिद्ध ठरवलेल्या गोष्टी करणे म्हणजे अधर्म किंवा पाप होय. धर्माविषयी श्रीशंकराचार्य म्हणतात- समाजव्यवस्था उत्तम राहणे,प्रत्येक प्राणिमात्राची ऐहिक आणि पारलौकिक उन्नती होणे या गोष्टी ज्यामुळे साध्य होतात तो धर्म होय.

"धर्म" या संकल्पनेची सुरुवात कुठून आणि कशी झाली याचा सखोल विचार केला तर प्रत्येक धर्मग्रंथात त्याची वेगवेगळी उत्तरे मिळतात. जगातील विविध धर्मांची सुरुवात एका छोट्या प्रदेशात झाली आणि काळाच्या वाटचालीत तो अन्यत्र पसरत गेला असा विचार सर्वानुमते पुढे आला. मानवाच्या समूहाने राहण्याच्या गुणधर्मातून समाजाची निर्मिती झाली आणि या समाजाला एकसंध ठेवणारी आणि आचरणाची दिशा दाखविणारी व्यवस्था म्हणून धर्म ही संकल्पना अस्तित्वात आली. भारतीय तत्त्वज्ञान धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चार पुरुषार्थांशी निगडित आहे.सद्यस्थितीत हे चार पुरुषार्थ समजून घ्यायचे असतील तर पुरुषी मानसिकता सोडून द्यावी लागणार.

कारण स्त्री आणि पुरुष यांनी आपापल्या क्षेत्रात केलेल्या सर्वोत्तम कामगिरीला पुरुषार्थ म्हटले जाऊ लागले. त्यापैकी धर्म हे त्यातील पहिले क्षेत्र आहे. त्याची निर्मिती समाजाच्या उत्कर्षासाठी झाली. भटक्या अवस्थेत राहणाऱ्या आदी मानवावरून ते अत्यंत प्रगतशील मानवापर्यंत सर्वांनाच धर्म व्यापून राहिला आहे. माणसाच्या या विकास क्रमांमध्ये त्याच्या जन्मापासून दोन गोष्टी त्याच्याबरोबर सतत राहिल्या आहेत त्यापैकी एक आहे धर्म आणि दुसरी आहे नीती. या दोन गोष्टींशिवाय माणूस राहूच शकत नाही. म्हणजेच मानवी जीवनात धर्म राहणारच. पण तो सामाजिक आणि व्यक्तिगत जीवनात कसा राहिला पाहिजे याचा विचार करणे आवश्यक आहे. धर्मभावनेचं सतत नव्याने परिष्करण होणे आवश्यक आहे. धर्माचा पुनःपुन्हा बदलत्या काळात नव्याने विचार व्हायला हवा. त्यातील कोणत्या गोष्टी टाकाऊ झाल्या आहेत व कोणत्या गोष्टी काळाला अनुरूप स्वीकारल्या पाहिजेत याचं एक सतत परिष्करणात्मक आंदोलन चालवायची गरज आहे. धर्म हा समाजाला पोषक व्हायला पाहिजे पण ज्या ज्या वेळी याच्या उलट घडू लागले त्या त्या वेळी या धर्मसंस्थांविरुद्ध बंड झालेली पाहायला मिळतील. त्यामध्ये बुध्दांच्या आणि महावीरांच्या बंडाचा उल्लेख करता येईल. क्षेत्रीय समाजातून आलेल्या या दोघांनी धर्माविरुद्ध बंड केलेले आहे आणि हिंसेला अहिंसेने उत्तर दिलेले आहे. पुढील काळात धर्माचे परिष्करण होताना राजा राममोहन रॉय यांचा ब्राह्मोसमाज, न्यायमूर्ती रानडे आणि भांडारकरांचा प्रार्थनासमाज, महात्मा फुलेंचा सत्यशोधक समाज, दयानंद यांचा आर्यसमाज अशी धार्मिक बंडही झालेली पाहायला मिळतात.या पार्श्वभूमीवर धर्माचा खूप वेगळ्या पद्धतीने विचार केला तो म.गांधी यांनी. महाआरती आणि रस्त्यावरील नमाज यांच्या द्वंद्वांमध्ये मानवी समता प्रस्थापित करण्याचे काम गांधीजींचा धर्मविचार करतो.या सर्व पार्श्वभूमीवर म. गांधीजींनी धर्माकडे कसं पाहिलं? हे पाहणे म्हणजे गांधीजींचा धर्मविचार समजून घेणे होय.

**गांधीजींचा धर्मविचार** - खूप वेगळ्या पद्धतीने धर्माचा विचार करताना गांधीजींनी मानवी जीवनाच्या सर्वच पैलूंना स्पर्श करणारे तत्त्वज्ञान आपल्या लेखणीतून आणि वाणीतून मांडले. मानवी जीवनापुढे त्यांनी जी शाश्वत मूल्ये ठेवली तिच पुढे गांधीवाद म्हणून ओळखली जाऊ लागली. साध्य आणि साधन यांच्या शुद्धतेचा आग्रह त्यांनी मांडला. गांधीजी जन्माने हिंदू होते त्यामुळे हिंदू धर्मावर त्यांची अपार श्रद्धा होती. इतर धर्मांचाही ते तितकाच आदर करत. कारण सर्वधर्मांना शेवटी एकच सत्य सांगायचे आहे असे ते म्हणत. हिंदू धर्माविषयी जाज्वल अभिमान व्यक्त करताना ते म्हणतात- मी हिंदू धर्मात जन्माला आलेलो आहे, हा धर्म मला जन्माने लाभलेला आहे तो मी त्याच्या गुणदोषांसकट मनापासून स्वीकारतो,त्याचा मी आदर करतो. त्यानं उभं राहण्याची जी मला भूमी दिली आहे त्या रणभूमीमध्ये उभा राहून या धर्माविषयी माझा विचार मी मांडणार आहे. हिंदू म्हणून माझ्या धर्माचा अर्थ लावण्याचा अधिकार मला आहे. सर्वधर्मसमभावाचा अर्थ सर्वधर्मातील चांगल्या बाबींचा स्वीकार करणं आणि वाईट बाबींचा त्याग करणं या व्यापक पातळीवर गांधीजींनी हा अर्थ लावलेला आहे असे आपल्याला दिसते.

भगवद् गीता हा हिंदूधर्मियांचा प्रमाण ग्रंथ आहे. तत्त्वज्ञानाने भरलेल्या या ग्रंथात चराचराच्या धर्माचे विवेचन आहे. गांधीजींना या ग्रंथाविषयी प्रचंड अभिमान असणे हे स्वाभाविक आहे. या स्वाभाविकतेतूनच ते गीताबोध या ग्रंथात आपले धर्मविषयक विचार स्पष्ट करतात. आश्रमवासियांकरिता येरवडा जेलमधून गांधीजी दर आठवड्याला गीतेच्या एका अध्यायाचा सार लिहून पाठवत( ४-१-१९३० ते २१-२-१९३२). तो सार म्हणजेच गीताबोध होय. प्रस्तावने ते लिहितात-गीता हा महाभारतातील एक लहानसा विभाग आहे. महाभारत हा ऐतिहासिक ग्रंथ आहे असे समजले जाते परंतु आपल्याकरिता रामायण आणि महाभारत हे ऐतिहासिक ग्रंथ नसून धार्मिक ग्रंथ आहेत आणि त्यांना ऐतिहासिक म्हणायचे असेल तर तो आत्म्याचा इतिहास आहे आणि त्यात हजारो वर्षांपूर्वी जे घडले त्याचा इतिहास नाही तर आज प्रत्येक मनुष्याच्या देहात काय सुरू आहे याचे चित्रण करण्यात आले आहे. गीतेमध्ये श्रीकृष्णाने अर्जुनाला काय सांगितलं की लढणं तुझा धर्म आहे. समोर तुझे भाऊबंद,गुरूवर्य पितामह, द्रोणाचार्य,कृपाचार्य, हितचिंतक आणि सगेसोयरे आहेत. पण तुला न्यायासाठी व धर्माच्या पूनर्स्थापनेसाठी त्यांच्याशी लढावंच लागेल. या संवादाच्या पार्श्वभूमीवर गांधीजी आपले विचार मांडतात. या संवादावर गांधीजी न्याय आणि धर्माची स्थापना लढूनच होणार होती का? आणि संवादाचे मार्ग संपले होते का? असे दोन प्रश्न उपस्थित करतात व त्यांची उत्तरेही ते स्वतःच्या विचाराने मांडतात. येथेच धर्माचे परिष्करण होताना दिसते. हे विचार मांडताना ते

टिळकांनी गीतेविषयी लावलेला जो अर्थ आहे तो अमान्य करतात व नवीन असा अर्थ पूनर्स्थापित करतात त्यामुळे गांधीजींचे वेगळेपण येथेच असल्याचे स्पष्ट होते. गांधीजी म्हणतात लढाई, शौर्य, पराक्रम हे माणसाचं कर्तुत्व नाही. युद्धामध्ये हौतात्म्य पत्करलेल्या वीरांचे वीरत्व हे कोणत्यातरी जीवाची किंमत मोजूनच सिद्ध झालेले असते. युद्धभूमीवर लढता लढता दोन्ही बाजूचे वीर हौतात्म्य पत्करतात तेव्हा दोन्ही पक्षांनाही आनंद होतो. पण युद्धात बळी जाणारा केवळ वीर नव्हता तर तो प्रथम मानव होता आणि माणूस मेल्याचे दुःख कोणालाच होत नाही याविषयी खंत व्यक्त करतात. गांधीजींच्या विचारपरिप्रेक्ष्यात मुळात आपल्याला लढाईच का करायची आहे? या प्रश्नाने जोर धरलेला दिसतो. येथे जर सर्वच माणसे सारखी आहेत, त्यांना जीवमात्राचे अधिकार आहेत तर त्यांना मारण्याचा अधिकार कोणी दिला? अधिकारशून्यतेने केलेले कोणतेही कार्य हे संकुचित कल्पनेने भरलेला असते यावर त्यांचा ठाम विश्वास आहे. कारण कोणाच्यातरी हत्येवर कोणाचंतरी वीरत्व अवलंबून असणं ही गोष्टच मुळात अयोग्य आहे. धर्माच्या, राष्ट्राच्या संरक्षणासाठी इतर माणसांना मारणं म्हणजे लढाई आणि लढाईत जो जास्त माणसं मारेल त्याला वीर म्हणून गौरविणे कोणत्याही स्वरूपात मान्य असत नाही. म्हणून गांधीजी अशा वीरत्वाच्या संकल्पनेचा गौरव करीत नाहीत. पण नाईलाजाने युद्ध करावे लागले आणि त्यात माणसे मेली तर त्याबद्दल गांधीजी दुःखही व्यक्त करतात. कोणाच्यातरी हत्येवर पराक्रम, शौर्य, वीरत्व अवलंबून असतं ही गोष्टच अयोग्य आहे.म्हणून गीतेकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहतात.

पाच- दहा हजार वर्षांपूर्वी गीतेचा जन्म कुरुक्षेत्र, धर्मक्षेत्र मानल्या गेलेल्या युद्धभूमीवर झाला आहे. काळाच्या वाटचालीत श्रीशंकराचार्य गीतेला संन्यासमार्गी मानतात. संन्यास हा गीतेचा आदेश आहे असे समजतात.पण मुळात श्रीशंकराचार्य हे जगच मिथ्या मानतात त्यामुळे गीता कर्मयोगी मानली काय किंवा संन्यासमार्गी मांनली काय याला अर्थच उरत नाही.श्रीशंकराचार्यांच्या उलट गीतेचे रहस्य उलगडताना टिळकांनी गीतेला कर्ममार्गी ठरवले. हे ठरवताना लोकसंग्रह,अंतकरणाची शुद्धता आणि संघर्ष या तीनही गोष्टी अशक्य आहेत असेही ते म्हणतात. त्यांच्या मते संघर्ष करताना साध्य व साधन यामध्ये विसंगती ,तफावत निर्माण होऊ शकते. चांगल्या कामासाठी हिंसेचा वापर करावा लागतो आणि त्यामुळे अंतःकरणात दोष निर्माण होतात अंतःकरणाला मलिनता येते. पण ती अत्यावश्यक गोष्ट आहे.अशा विचारालाच गांधीजींचे टिळकांशी मतभेद झाले. या मतभेदाचे स्पष्टीकरण देताना गांधीजी म्हणतात, लोकसंग्रहही करता येतो. संघर्षही करता येतो. फक्त संघर्ष करत असताना इकडचे आणि तिकडचे या श्रेणीच काढून टाकाव्या लागतील.संघर्ष कशाविरुद्ध करायचा आहे? चांगल्या विरुद्ध वाईट, धर्म विरुद्ध अधर्म, सुष्ट विरुद्ध दुष्ट हे प्रथमतः ठरवावे लागेल. हे सर्व इकडेही असतात आणि तिकडेही असतात त्यामुळे आपपरभाव सोडून शत्रूभावी दृष्टिकोनही सांगावा लागेल. संघर्ष म्हणजे शत्रू. शत्रू म्हणजे कोणालातरी निश्चित करणं आणि शत्रूचा नायनाट करण्यासाठी तयारी करणं ही कल्पनाच गांधीजींनी बाजूला टाकली. त्यामुळे ते समाजाचा शत्रूभावी पद्धतीने विचारच करत नाहीत. पाक असेल, चीन असेल किंवा दुसरे एखादं राष्ट्र असेल ज्याच्याशी आपलं भांडण झालं तर त्या राष्ट्रांमध्ये एका टोकाला राहणारा नागरिक आपला काय म्हणूनशत्रू असेल? मी त्याचा काय म्हणून शत्रू असेल? शत्रू होण्यासाठी लागणारा संबंधही आपल्यामध्ये निर्माण होत नाही.भारत- पाक, भारत- चीन किंवा भारत आणि कुठलंही इतर राष्ट्र या दोन नागरिकांच्यामध्ये भांडण का तर त्यांच्या राज्यकर्त्यांनी ठरवले की आपण शत्रू आहोत एकमेकांचे, लोकांनी ठरवलेलं नाही. शत्रूत्व निर्माण होण्यासाठी सहवास लागतो तोच नाही मग शत्रूत्व का? म्हणून गांधीजींची कायमची लढाई एका राष्ट्राविरोधी नाही तर व्यवस्थेविरोधात आहे.शत्रूकेंद्री जी व्यवस्था असते तिच्याविरुद्ध गांधीजी बोलतात, तिच्याविरुद्ध लढतात. गांधीजी ब्रिटिश साम्राज्याविरोधी का लढले तर साम्राज्य वाईट नाही तर साम्राज्यशाही वाईट आहे .गांधीजी ब्रिटिशाविरोधात लढले नाहीत तर ब्रिटिश व्यवस्थेच्या विरोधात लढले. तेही अहिंसेने, सत्याग्रहाने आणि असहकाराने हा ही फरक लक्षात घ्यायला हवा. म्हणून इंग्रजांनासुद्धा असा प्रश्न पडला की या गांधीजींचे करायचं काय. ब्रिटिश काळातील एक सुप्रीटेंडंट ऑफ पोलीस होते ज्यांनी त्यांच्या कागदपत्रात नोंद करून ठेवले आहे की या गांधीच काय करायचं हेच आम्हाला कळत नाही. का तर हा आमचा नाही म्हणावं तर तो आमच्यावर प्रेम करतो आणि आमचा आहे म्हणावं तर आमच्या विरुद्ध उभा राहतो.याचं कारण ब्रिटिश माझे शत्रू नाहीत आणि त्यांची व्यवस्था शोषण करणारी आहे म्हणून ते माझे मित्रही नाहीत.माझी लढाई आहे ती ब्रिटिशांच्या

शोषणाला, गुलाम करणाऱ्या व्यवस्थेला. हा पेच या अधिकाऱ्यांपुढे त्या काळात निर्माण झाला होता. या सर्व विवेचनावरून संशोधन विषय म्हणून गांधीजींचे काही महत्त्वाचे धार्मिक विचार येथे उद्धृत करणे मला सोयीचे वाटते ते असे-

१. जसा परमात्मा सत्य आहे तसा अंतरात्मा आणित्याची वाणीही सत्य आहे.

२.गांधीजींच्या विचारांचे मूळ आधार हा सत्याग्रहआहे.

३.स्पृश्य -अस्पृश्यता पाळणे हा समाजाचा गंभीरदोष आहे अस्पृश्यांच्या कल्याणासाठी त्यांनी त्यांना "हरिजन" (ईश्वराचे लोक) असे नाव दिले.

४.गांधीजींचे विचार सत्यावर आधारित आहेतआणि सत्य हे अहिंसेवर आधारित आहे.

५. गांधीजींचा विचार हा नैतिकतेचे पुरेपूर दर्शनघडवतो.

६.गांधींजींच्या मते पवित्र साधन मिळाले नाही तरसाध्यालाही सोडून द्या.

७.सामाजिक जीवनावर हिंदू धर्माच्या संस्कारांचाप्रभाव पडणे आवश्यक आहे.

८.माणूस धर्मासाठी नाही तर धर्म माणसासाठी आहेयाचे सातत्याने भान ठेवणे

९. कोणाचातरी बळी देऊन मिळवलेलं वीरत्व मीकधीच मान्य करणार नाही.

अशा काही महत्त्वपूर्ण तत्वप्रणालींवर त्यांनी आपली सर्वच आंदोलने यशस्वी केलेली पाहायला मिळतात.

**समारोप** - गांधीजींच्या विचारालाच गांधीवाद म्हणून जगभर मान्यता मिळाली.गांधीजी मनाने अतिशय निर्मळ होते. त्यांना आयुष्यात कधी कोणाची भीती वाटली नाही .सत्याचा शोध हे माझ्या आयुष्याचे ध्येय आहे आणि त्यासाठी कितीही त्रास सहन करायला मी तयार आहे. प्रसंगी जगाविरुद्ध मी एकटा उभा राहिन अशीही त्यांची धारणा होती. गांधीजींनी स्वतःसाठी जी मूल्यव्यवस्था तयार केली ती त्यांनी स्वतःच्या आयुष्यामध्ये अत्यंत काटेकोरपणे आणि कठोरपणे अंमलात आणली म्हणून गांधीजींच्या विचाराचा आणि कृतीचा ठसा साऱ्या जगतावर उमटला. प्राचीन संत महात्म्ये, आचार्य, बुद्ध, महावीर इसा मसाहे यांनी अहिंसा केवळ व्यक्तिगत आयुष्यात लागू केली. सामाजिक आणि राजकीय प्रश्नांपासून ते अलग राहिले. पण गांधीजींची विचारधारा आणि कृती जीवन जगण्याचा उत्तम रस्ता आहे. सध्याच्या काळात धार्मिक द्वेष, सांप्रदायिकता, आतंकवाद, सीमावाद इत्यादीमुळे सर्वत्र अशांतताच अशांतता आहे. अशा अशांततेत गांधीजींचे धार्मिक विचार हा एक रामबाण उपाय आहे आणि हा उपाय करण्याची गरज आज जगाला भासू लागली आहे.

**संदर्भग्रंथ**

१. गीताबोध -मो के गांधी अनुवाद ब्रिजमोहन हेडानवजीवन प्रकाशन अहमदाबाद

२. आधुनिक भारतीय तत्त्वचिंतक - ग. ना. जोशीशुभदा प्रकाशन ,पुणे

३. हिंद स्वराज्य - मो.के. गांधीनवजीवन प्रकाशन अहमदाबाद

४. प्रबोधन प्रकाश ज्योती (मासिक) समाजवादीप्रबोधिनी इचलकरंजी.